## 1. मोड्युलचे सविस्तर वर्णन आणि त्याची रचना

| मोड्यूल सविस्तर | |
|---|---|
| विषयाचे नाव | अर्थशास्त्र |
| अभ्यासक्रमाचे नाव | भारताची आर्थिक प्रगती ०१ (इ.११वी, सत्र पहिले) |
| मोड्युलचे नाव / शीर्षक | १९९१ पासूनच्या आर्थिक सुधारणा भाग 2 |
| मोड्यूल आय.डी. | keec_10302 |
| पुर्वापेक्षित | १९५० ते १९९० या काळातील भारतीय अर्थव्यवस्थेचे ज्ञान |
| उद्दिष्टे | हा धडा वाचल्यानंतर, विद्यार्थ्यांना खालील गोष्टी शिकण्याची व् समजू न घेण्याची पात्रता लाभेल :<br>• खाजगीकरण<br>• जागतिकीकरण<br>• जागतिक व्यापार संघटना<br>• आउटसोर्सिंग<br>• एल.पी.जी.योजनांचे मूल्यांकन |
| संकेतिक शब्द | खाजगीकरण, जागतिकीकरण, आउट सोर्सिंग , जागतिक व्यापार संघटना |

## 2. Development Team

| Role | Name | Affiliation |
|---|---|---|
| National MOOC Coordinator (NMC) | Prof. Amarendra P. Behera | CIET, NCERT, New Delhi |
| Program Coordinator | Dr. Mohd. Mamur Ali | CIET, NCERT, New Delhi |
| Course Coordinator (CC) / PI | Prof. Neeraja Rashmi | DESS, NCERT, New Delhi |
| Subject Matter Expert (SME) | Mr. Naveen Sadhu | Guru Nanak Public School, Rajouri Garden, New Delhi |
| Review Team | Dr. Meera Malhan<br>Dr. Himanshu Singh | DCAC, University of Delhi<br>Satyawati College (Eve.), University of Delhi |
| Translator | Dr. Parag Ramakant Kukade | Assistant Prof., Takshashila Mahavidyalaya Amravati |

**अनुक्रमाणिका**

१. खाजगीकरण
२. खाजगीकरणाच्या बाजूने आणि खाजगीकरणाच्या विरोधात युक्तिवाद
३. जागतिकीकरण
३.१ जागतिकीकरणाचे सकारात्मक आणि नकारात्मक गुणधर्म
३.२ आउट सोर्सिंग
३.३ जागतिक व्यापार संघटना
४. एल.पी.जी. योजनांचे मूल्यांकन
४.१ आर्थिक सुधारणांच्या बाजूने युक्तिवाद
४.२ आर्थिक सुधारणांच्या विरुद्ध टीका
५ सारांश

## १. खाजगीकरण

आर्थिक सुधारणांचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे खाजगीकरणाच्या योजनेला प्रोत्साहन दिले आहे. या योजनेच्या अंतर्गत वेगवेगळया प्रकारच्या आर्थिक कार्यामध्ये खाजगी क्षेत्राला महत्वाची भूमिका बजावण्याची परवानगी दिली गेली. दुसऱ्या शब्दांत आपण असे म्हणू शकतो की खाजगीकरण हि एक अशी प्रक्रिया आहे की जीने आपल्या अर्थव्यवस्थेमधील राज्यस्तरीय किंवा सार्वजनिक क्षेत्रांचा सहभाग कमी केला.

**जागतिकीकरण म्हणजे मालकी हक्काचे हस्तांतरण,सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थांचे व्यवस्थापन आणि नियंत्रण खाजगी क्षेत्रांतील नवउद्योजकांकडे देणे होय.**

खाजगीकरणा तून खाजगी क्षेत्रांची देशाच्या आर्थिक कामकाजातील महत्वाची भूमिका सूचित केली जाते. काही वर्षांच्या कालावधी नंतर भारतीय सरकारने आपले भागभांडवल सौम्य प्रकारे बऱ्याच सार्वजनिक संस्थांमध्ये आणले ज्यामध्ये आय.पी.सी.एल.,आय.बी.पी.,मारुती उद्योग इ.यांचा समावेश होता.

खाजगीकरण खालील प्रकरानी करता येते :

१. मालकी हक्कांचे आणि खाजगी क्षेत्रांतील कंपनीच्या व्यवस्थापनाचे सरकारकडून खाजगी क्षेत्रांमध्ये हस्तांतरण करणे.

२. सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थांचे खाजगीकरण सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थांची अंशतः इक्विटी जनतेला विकून करणे.

३. खाजगी क्षेत्रांतील औद्योगिक कारखान्याचा प्रवेश सार्वजनिक क्षेत्रांतील पूर्णपणे राखीव औद्योगिक कारखान्यांमध्ये करणे.

४. सार्वजनिक क्षेत्राच्या विस्तारावर मर्यादा आणणे आणि अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक क्षेत्रांचा पुढील विस्तार थांबविणे.

खाजगीकरणाचा उद्देश आर्थिक शिस्त सुधारित करणे आणि आधुनिकीकरण प्रक्रिया घडवून आणणे असा होता. असा विश्वास सुद्धा केला जात होता की खाजगी भांडवल आणि व्यवस्थापकीय सक्षमता यांमुळे सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थांची कामगिरी सुधारण्यात मदत होईल.

## २. खाजगीकरणाच्या बाजूने आणि खाजगीकरणाच्या विरुद्ध युक्तिवाद

सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांची डळमळीत कामगिरी दृष्टी पथात घेता, त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर खूप दबाव आणला होता यांचे कारण मुख्यत्वे मोठया प्रमाणावर होणारे नुकसान आणि वाढती अनुदान वाटप

प्रक्रिया असे होते. खाजगीकरणामुळे सरकारचा आर्थिक दबाव कमी केला. खाजगीकरणामुळे सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांची  एकाधीकाराची स्थिती संपविली आणि या संस्थांमधील स्पर्धात्मक बळकटी आणि सक्षमता सुधारण्यास मदत झाली. व्यवस्थापकीय गुणवत्ता सुधारण्यासाठी मदत झाली कारण व्यवस्थापनाच्या मते अनावश्यक राजकारणी प्रभाव ,  दबाव आणि हस्तक्षेप नको होता. तेथे अनावश्यक लोकांची भरती करण्यासाठी कोणताही राजकारणी दबाव नव्हता त्यांमुळे संस्थेची सक्षमता सुधारण्यास चालना मिळाली. त्वरित आणि वेळेवरील निर्णय हे स्पर्धात्मक जगामध्ये यशस्वी होण्याचे मार्ग आहेत खाजगीकरणाची योजना हि निर्णय प्रक्रियेमध्ये अधिक सुलभता आणणारी उपयोगी प्रक्रिया असून सरकारी हस्तक्षेपांपासून विलग ठेवते. ग्राहक हा खाजगीकरणा मध्ये सर्वोत्तम असतो. खाजगी संस्थांचे अस्तित्व हे ग्राहकांना मिळणाऱ्या समाधानावर अवलंबून असते. खाजगीकरणामुळे ग्राहकांची काळजी घेतली जाते कारण खाजगीकरणाची गरज बाजार मिळविण्याकडे आणि मिळालेला बाजार राखून ठेविण्याकडे असते. म्हणुंन, त्यांच्या कडून दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा सुधारित व उत्कृष्ट असतो. शिवाय खाजगीकरणामुळे काही भाग उघडले जातात जे आधी सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थाच्या साठी राखीव ठेवले होते उदा. विमा क्षेत्र. इ.यांमुळे खाजगी क्षेत्रांतील गुंतवणूक वाढते.त्यांमुळे रोजगारांच्या नवीन संधी उपलब्ध होण्यासाठी आर्थिक क्षेत्रात उत्पन्न कमविण्याच्या नवीन संधी उपलब्ध होण्यासाठी चालना मिळते.

### खाजगीकरणाच्या विरोधातील युक्तिवाद

असा युक्तिवाद केला जातो की खाजगीकरणाच्य प्रक्रियेमुळे सामाजिक भरभराटीला वगळले जाते. खाजगी क्षेत्रांतील संस्था या मुख्यत्वेकरून अधिकाधिक फायदे मिळविण्याच्या उद्दिष्टासाठी कार्यरत असतात आणि हि पद्धती सामाजिक भरभराटीची खात्री गरीब लोकांना देत नाही. खाजगी क्षेत्रे अश्या प्रकल्पांमध्ये रस घेत नाही जे धोकादायक असतात, दुरगामी कालावधीचे असतात आणि कमी फायदे देणारे असतात.हे प्रार्थमिक आणि उच्च उद्योग कारखान्यांच्या आणि आपल्या देशांतील पायाभूत सुविधांच्या वाढीसाठी कदाचित उलट परिणाम करते. जागतिक बँकेच्या अभ्यासाप्रमाणे असा अंदाज लावला जातो की भारतातील पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक १९९१-९२ मध्ये वास्तविक एकूण घरगुती उत्पादनाच्या ५.४ टक्क्यांपर्यंत खाली आली होती, १९९७-९८ मध्ये ती ४.६ टक्क्यांपर्यंत खाली घसरली. सरकारचा सहभाग कमी झाल्यामुळे परिणामी सार्वजनिक एकाधीकारांच्या बदली खाजगी एकाधिकार प्रत्ययास आले, कदाचित त्यामुळे सक्षम खाजगी मालकांकडून एकाधीकारातून होणाऱ्या पिळवणूकी ला पुढे चालना मिळत गेली. राज्याचा एकाधिकार नेहमी खाजगी एकाधीकारापेक्षा नक्कीच जास्त पसंत केला जातो. खाजगीकारणामध्ये नेहमी नोकरी वरून काढण्याची भीती असते आणि त्या अनुषंगाने बेरोजगारीचा प्रसार होतो. सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थांमध्ये खाजगीकरण आल्यामुळे खूप कामगारांच्या स्वेच्छानिवृत्ती प्रक्रियेला चालना मिळते. अशाप्रकारे,हि योजना देशामध्ये अधिकाधिक गरीबी आणि बेरोजगारी पसरविण्यात हातभार लावते.

### नवरत्न आणि मिनीरत्न

सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांच्या कारकीर्दीमध्ये नवरत्ने म्हणजे फायदे कमाविणाऱ्या अशा नऊ कंपन्या ज्यांची तुलना सुप्रसिद्ध आणि दुर्मिळ तल्लख हुशार अशा राजा विक्रमादित्याच्या दरबारांत नऊ देशांबरोबर केली जात असे. सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थांची क्षमता वाढविण्याच्या आणि सुधारण्याच्या उद्दिष्टाने त्यांना शीर्षक दिले जात होते, सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थाना व्यवस्थापकीय निर्णय घेण्यासाठी स्वायत्तता दिली जात होती. जसे काही सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थाना नवरत्न आणि मिनीरत्न म्हणून विशिष्ठ दर्जा संमत केला गेला.उदा.बी.एच.ए.एल.,बी.पी.सी.एल.,एस.ए.आय.एल. इ. त्यांना विविध निर्णय

घेण्यासाठी व्यवस्थापकीय आणि कार्यरत स्वायत्तता दिली गेली त्यामुळे ते त्यांचे फायदे वृद्धिंगत करण्यासाठी कंपनी सक्षमतेने चालवीत असत.
नवरत्न हा दर्जा संमत करण्यामुळे परिणामी या कंपन्यांची कामगिरी खुपच सुधारली. याशिवाय इतर ९७ फायदे कमाविणाऱ्या संस्था यांना सुद्धा अधिक कार्यरत, आर्थिक आणि व्यवस्थापकीय स्वायत्तता संमत झाली आणि त्यांना “मिनीरत्न”.

म्हणून सूचित केले गेले जून २०१६ मध्ये एकूण १७ नवरत्न झाले त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:
१ भारत इलेक्ट्रोनिक्स लिमिटेड
२ भारत पेट्रोलीयम कॉर्पोरेशन लिमिटेड
३ कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड
४ इंजिनिअर्स इंडिया लिमिटेड
५ हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड
६ हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
७ महानगर टेलिफोन निगम लिमिटेड
८ राष्ट्रीय अल्युमिनियम कंपनी लिमिटेड
९ राष्ट्रीय बिल्डिंग कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन लिमिटेड
१० एन.एम.डी.सी.लिमिटेड
११ नेयवेली लिग्नाईट कॉर्पोरेशन लिमिटेड
१२ ओईल इंडिया लिमिटेड
१३ पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड
१४ पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ फायनान्स इंडिया लिमिटेड
१५ राष्ट्रीय एस्पात निगम लिमिटेड
१६ रुरल इलेक्ट्रिफिकेशन कॉपोर्रेशन लिमिटेड
१७ शीप्पिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड इ.

**३. जागतिकीकरण**

जागतिकीकरणातून जगाच्या अर्थव्यवस्थेची सुरुवात सूचित केली जाते. त्यातून उत्पादनाच्या,व्यापाराच्या आणि आर्थिक व्यवहारांच्या संबंधित जगातील इतर देशांशी अर्थव्यवस्थेतून सुसंवाद सूचित केला जातो. जागतिकीकरणाची योजना परकीय व्यापार आणि परकीय गुंतवणूक यांना उत्तेजन देते.
**जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रीय अर्थव्यवस्था आंतर राष्ट्रीय व्यापारातील अडथळे दूर करून आणि भांडवली हालचालींना वेग आणून जगाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सामावली जाते.** जागतिकीकरण म्हणजे उदात्तीकरण आणि खाजगीकरण या दोन्ही योजनांचे फलित आहे.हे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे जगाच्या अर्थव्यवस्थेमध्ये झालेले एकत्रीकरण आहे आणि हे अशा विविध योजनांचे फलित आहे ज्या जगाला एकमेकांवर अधिकाधिक अवलंबून आणि एकत्रित
असे परावर्तीत करण्याच्या उद्देशाने कार्यरत आहेत. यांमध्ये नेटवर्क बनविण्याचे आणि आर्थिक, सामाजिक व भौगोलिक सीमा ओलांडण्याची प्रक्रिया अंतर्भूत आहे. थोडक्यात जागतिकीकरणाचा उद्देश सीमारहित जगाची निर्मिती करण्याकडे आहे.

## जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत बदल झाले

नवीन आर्थिक योजनेने अधिक तंत्रज्ञान आणि अधिक गुंतवणूक असलेल्या औद्योगिक कारखान्यांना प्राधान्य देऊन त्यांची एक विशिष्ट यादी बनविली त्यामध्ये परदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला विदेशी इक्विटी च्या ५१ टक्क्यांपर्यंत स्वयंचलित परवानगी दिली.परदेशी तंत्रज्ञान करार संबंधातून स्वयंचलित परवानगी एक कोटी रुपयांपर्यंत अधिक प्राधान्य असलेल्या कारखान्यांना पुरविली जाते. विदेशी तंत्रज्ञ नेमण्यासाठी किवा स्वदेशी विकसित तंत्रज्ञान परदेशात तपासून बघण्यासाठी कोणतीही परवानगी आता घ्यावी लागत नाही.भारतीय चलनाची जागतिक बाजारात समायोजन करणेसाठी जवळपास २० टक्क्यांनी रुपयाचे अवमूल्यन जुलै १९९१ मध्ये झाले. यामुळे निर्यातीला उत्तेजन मिळाले आणि आयातीची घसरण झाली, त्यामुळे विदेशी भांडवलाचा ओघ बळावला.आपली अर्थव्यवस्था जगामध्ये अंतर्भूत करण्यासाठी भारतीय रुपयाला १९९२-९३ च्या युनिअन बजेट मध्ये अंशतः रुपांतरीत केला नंतर १९९३-९४ च्या बजेट मध्ये हा रुपया चालू खात्याच्या व्यवहारांमध्ये पूर्णतः रुपांतरीत झाला.पाच वर्षांची आयात निर्यात योजना (१९९२ ते १९९७) हि भारतीय परदेश व्यापारात जागतिकीकरणाची चौकट तयार करण्यासाठी भारत सरकारने जाहीर केली. या योजनेने सर्व बंधने घालविली, परदेशी व्यापारावर नियंत्रण आणले आणि बाजारांतील घटकांना आयात आणि निर्यातीसाठी महत्वाची भूमिका वर्तविण्यासाठी परवानगी दिली. भारतीय अर्थव्यवस्था जागतिक स्पर्धेच्या कक्षेमध्ये आणण्यासाठी भारत सरकारने कस्टम ड्यूटीवर वैचारिक पातळीच्या अनुषंगाने नाविन्य आणले. त्याप्रमाणे कस्टम ड्यूटी चा उच्च दर २००७-०८ च्या बजेट मध्ये काही विशिष्ठ मालावरती २५० टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत खाली आला.

## ३.१ जागतिकीकरणाची सकारात्मक आणि नकारात्मक वैशिष्ठे

जागतिकीकरणाची प्रक्रिया हि उदात्तीकरण आणि खाजगीकरण योजनांमधून झाली आहे त्यातून त्याचे भारत आणि इतर देशांसाठी सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम तयार झाले.

### जागतिकीकरणाच्या बाजूने युक्तिवाद

जागतिकीकरणामुळे उपयोगात आणलेल्या साधनांची क्षमता सुधारित करण्यासाठी चालना दिली, भांडवली उत्पादनाचे गुणोत्तर कमी केले आणि विदेशी भांडवलाचा अंतर्प्रवाह वाढविला, भारतीय अर्थव्यवस्थेतील सरासरी वाढीचा दर वाढविला.वस्तूंचा आणि सेवांचा देशांतर्गत प्रवाह वाढविला. परिणामी जागतिक व्यापाराची भरभराट झाली. हि वस्तुस्थिती उत्पादानाचे पुनर्वितरण करण्यासाठी, भांडवली व्यापारी नमुना बनविण्यासाठी कामगारांची प्रबलता असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला मदतीची ठरली. तिने देशाची आर्थिक भरभराट वाढविली आणि जागतिक प्रगतीची संधी दिली.स्वस्त आणि उच्च दर्जाच्या ग्राहक वस्तू देशामध्ये आयात केलेल्या तंत्रज्ञान द्वारे उत्पादित केल्या जातात. बँकिंग आणि आर्थिक क्षेत्रांमध्ये सुधारणा झाली आणि विदेशी भांडवल व विदेशी बँका यांपासून स्पर्धा सुरु झाली.

### जागतिकीकरणाच्या विरुद्ध युक्तिवाद

काही तज्ञांनी जागतिकीकरणावर टीका केली कारण जागतिकीकरणाचे फायदे अधिक विकसित देशांना मिळण्यासारखे होते कारण ते त्यांचा वस्तूंचा बाजार इतर देशांमध्ये विस्तारीत करण्यास सक्षम होते जागतिकीकरणाने वस्तुतः गरीब देशांमध्ये भरभराट आणि तेथील गरीब लोकांची ओळख यांमध्ये तडजोड केली. बाजारांतून आलेल्या जागतिकीकरणाने राष्ट्रीय आणि लोकांमधील आर्थिक विवंचना व असमानता वाढविल्या.सर्वच देश त्यांच्या स्वतः च्या भौगोलिक कक्षेच्या बाहेर प्रगती करण्यास कमकुवत बनले. (यु.एस.चे प्रार्थमिक संकट,युरोचे संकट इ.)

### ३.२ आउट सोर्सिंग

हे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील महत्वाचे फलित आहे. व्यावसायिक सेवांची नियुक्ती बाहेरच्या लोकाकडून (समाजाकडून वा जगातून) करणे हे याद्वारे सूचित केले जाते.या सेवांमध्ये कॉल सेंटर, उतारा करणे (ट्रांसक्रिप्टशन),वैद्यकीय सल्ले सेवा, शिक्षण इ, या सेवांचा समावेश असतो.भारत हे आउट सोर्सिंग साठी एक महत्वाचे गंतव्य म्हणून ओळखले जाते. विशेषतः बी.पी.ओ.(बिझिनेस प्रोसेस आउट सोर्सिंग ला सुद्धा कॉल सेंटर संबोधले जाते.) याचे कारण आहे : अ) भारतामध्ये स्वस्त श्रमिकांची उपलब्धी आहे, किवा संबंधित कमी मेहनतान्याच्या दरांत आपले कुशल कामगार काम करीत असता,, आणि आ) भारतामध्ये संगणकीय माहिती तंत्रज्ञान उद्योगांची क्रांतिकारक वाढ झालेली आहे.
काही सेवा ज्या कंपन्यांकडून भारतातून आउट सोर्स झाल्या आहेत त्यामध्ये आवाजावर आधारित व्यापार संवर्धन( यांना बी.पी.ओ.किवा कॉल सेंटर असे म्हणतात.), नोंदी ठेवणे, हिशेब,बँकिंग सेवा, संगीत रेकोर्ड, फिल्म एडिटिंग, बुक ट्रांसक्रिप्टशन, वैद्यकीय सल्ले सेवा इ. यांचा समावेश होतो.

### ३.३ जागतिक व्यापार संघटना

जागतिक व्यापार संघटना १९४८ मध्ये जनरल अग्रीमेंट ऑन ट्रेड अन्ड टार्रीफ हे जागतिक व्यापार संघटना नावाने २३ देशांमध्ये प्रस्थापित झाले. जनरल अग्रीमेंट ऑन ट्रेड अन्ड टार्रीफ सर्व देशांना जागतिक बाजारपेठेत समान संधी देऊन सर्व बहुपक्षीय व्यापार कराराचे व्यवस्थापन करण्यासाठी अस्तित्वात आले. जागतिक व्यापार संघटना १९९५ मध्ये जनरल अग्रीमेंट ऑन ट्रेड अन्ड टार्रीफ  या संस्थेची उत्तराधिकारी संस्था म्हणून अस्तित्वात आली. जागतिक व्यापार संघटनेचे करारामध्ये वस्तू आणि सेवा यांचा व्यापार सुद्धा सामावला जात असे, त्यांमुळे जागतिक व्यापार कार्यरत होत होता. सद्येस्थितीत जागतिक व्यापार संघटनेचे एकूण १६४ सभासद देश आहेत, हे सर्व देश जागतिक व्यापार संघटनेने बनविलेले कायदे,नियम,योजना याद्वारे जागतिक व्यापार संघटनेच्या बंधन कक्षेमध्ये आहेत.जागतिक व्यापार संघटनेचा एक महत्वाचा सदस्य म्हणून जागतिक नियम,कायदे बनविण्यात भारत अग्रभागी आहे, आणि प्रगतशील जगाच्या हितामध्ये आपले हित सामावून घेत आहे. भारताने जागतिक व्यापार संघटनेला दिलेल्या वचनांशी आपली वचन बद्धता कायम ठेवली आहे.भारताने व्यापार उदारीकरणाने करण्यासाठी आयातीवरील परीमाणांत्मक मर्यादा हटवून आणि आयात मालावरील जकातीचे दर कमी करून संभाव्य पाऊले उचलली आहेत.

जागतिक व्यापार संघटनेची कार्ये

- आयात मालावरील जकात हटवून किवा विना जकात आयातीतील अडथळे दूर करून जागतिक व्यापार कार्यरत ठेवणे (दोन्ही द्विपक्षीय आणि बहुपक्षीय व्यापार) ;
- व्यापाराचे नियमबद्ध शासन प्रस्थापित करणे ज्यामध्ये कोणतीही राष्ट्रे स्वतःच्या मनमानीप्रमाणे व्यापाराच्या मर्यादा ठेवू शकणार नाहीत;
- उत्पादन आणि सेवांचे व्यापार वृद्धिंगत करणे;
- जागतिक साधनांच्या इष्टतम उपयोगीतेची खात्री देणे;
- पर्यावरणाचे संरक्षण करणे;
- सभासद देशांना व्यापार आणि आयात मालावरील जकात या संबंधीची भविष्यातील रणनीती ठरविण्यासाठी एक व्यासपीठ तयार करून देणे.

## ४. उदात्तीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण योजनांचे मूल्यांकन (आर्थिक सुधारणा)

आर्थिक सुधारणा या वेगवेगळ्या पातळीवर एकत्रित प्रतिक्रिया घडवीत गेल्या. आता आपण आर्थिक सुधारणांच्या सकारात्मक आणि नकारात्मक दृष्टीकोनांची चर्चा करू.

### ४.१ आर्थिक सुधारणांच्या बाजूने युक्तिवाद

खाली काही आर्थिक सुधारणांच्या बाजूने महत्वाचे युक्तिवाद मांडलेले आहेत :

1) अधिकतम वाढीचा दर- १९८० ते १९९१ या कालावधीत भारतातील एकूण घरगुती उत्पन्नातील वाढ ५.६ टक्क्यांपर्यंत होतो, ती १९९२ ते २००१ या काळात ६.१ टक्क्यांपर्यंत वाढली आणि पुढे २००७ ते २०१२ या काळांत ८.२ टक्क्यांपर्यंत वाढली. यावरून असे दिसून येते की आर्थिक सुधारणा काळामध्ये सर्वंकष एकूण घरगुती उत्पादन वाढीमध्ये चांगलीच वृद्धी झाली. या आर्थिक सुधारणा कालावधीमध्ये शेती आणि औद्योगिक क्षेत्रांतील वृद्धी खालाविली तर इकडे सेवाक्षेत्रातील वाढ उच्चपदाला गेली. यावरून असे दिसून येते की वाढ हि प्रामुख्याने सेवा क्षेत्रातील वाढीमुळेच खेचून आणली होती. सद्यस्थितीत एकूण घरगुती उत्पादनाच्या वाढीचा दर अंदाजे ८ टक्क्यांहून अधिक आहे.
2) टप्याटप्याने परदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक दरांत झालेली वाढ- नवीन आर्थिक योजनेने टप्याटप्याने वाढत चाललेल्या विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला आणि परदेशी चलन राखीवेला चालना दिली. १९९० ९१ मध्ये यु.एस.१०० मिलियन डॉलर ते २०१५-१६ मध्ये यु.एस.३५० बिलियन डॉलर पर्यंत परकीय चलन राखीवेमध्ये वाढ झाली.
3) निर्याती मधील वाढ- भारताच्या आयात आणि निर्यातीचे मूल्य १९९०-९१ पासून वैचारिक पातळीवर उंचावले. वाहनांचे भाग,अभियांत्रिकी वस्तू,माहिती तंत्रज्ञान सोफ्टवेर, कापड याच्या निर्यातीमध्ये वैचारिक दृष्ट्या वाढ भारताने अनुभवली.
4) महागाई वरील देखरेख – उत्पादनांतील वाढ,करांतील सुधारणा आणि इतर सुधारणा यांनी महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी मदत केली. महागाईचा वार्षिक दर हा १९९१ मध्ये उच्च पातळीवर म्हणजे १७ टक्क्यांपर्यंत होता तो २०१२-१३ मध्ये जवळपास ७.६ टक्क्यांपर्यंत आला. अशाप्रकारे काही प्रमाणांत महागाई घटली.
5) खाजगी क्षेत्रांची भूमिका वाढली- १९९१ पासून खाजगी क्षेत्रांची वरचढ भूमिका होती. परवाने पद्धती काढून टाकल्यानंतर आणि खाजगी क्षेत्राला प्रवेशासाठी लागणारे निर्बंध उठविल्यानंतर, जी क्षेत्रे अगोदर सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित होती, तेथे खाजगी क्षेत्रांच्या कामकाजाची जागा वाढविण्यात आली.
6) औद्योगिक क्षेत्राची कामगिरी- औद्योगिक क्षेत्राने अतिउच्च वाढीचा दर अनुभवला तो २००३-०४ पासून ८ टक्क्यांहून अधिक होता १२ व्या योजना काळांत या क्षेत्राने ७.४ टक्क्यांपर्यंत वाढीचा दर अनुभवला.

### ४.२ आर्थिक सुधारणांवरील टीका

नवीन आर्थिक सुधारणां विरुद्ध टीकांची एक मालिकाच प्रस्तुत झाली ती वेशेशतः पुढील मुद्द्यांच्या अनुषंगाने होती – नियुक्ती,शेती,उद्योग,पायाभूत सुविधांची प्रगती आणि वसुलीचे व्यवस्थापन. जरी एकूण घरगुती उत्पादनाच्या वाढीचा दर हा आर्थिक सुधारणा काळामध्ये वाढतच गेला पण हि वाढ देशामध्ये पुरेश्या नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात यशस्वी ठरू शकली नाही. आपण असे म्हणू शकतो की या वाढीतून नोकरी विरहित वाढीला चालना मिळाली. नवीन आर्थिक योजनेने उद्योग,व्यापार

आणि सेवा क्षेत्र यांच्या तुलनेत शेती क्षेत्राला वगळले. शेती क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक विशेषतः पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक ज्यामध्ये पाटबंधारे,विद्युत,रस्ते, बाजार दुवे आणि संशोधन व विस्तार हि आर्थिक सुधारणा कालावधीमध्ये खूप कमी झाली. खतांचे अनुदान काढून टाकल्यामुळे उत्पादनाची किमत वाढली, याचा छोट्या व लहान सहन शेतकऱ्यांवर उलट परिणाम झाला. शेतकी उत्पादनांवरील आयात कमी करण्याची योजना, कमीत कमी किमतीची वगळणूक, शेती उत्पादनांवरील परीमाणांत्मक निर्बंध हटविले, या सर्व बाबींचा भारतीय शेतकऱ्यांवर उलट परिणाम झाला कारण त्यांना वाढत्या जागतिक स्पर्धेला तोंड द्यावे लागत होते. शेतीमधील उत्पादनांच्या निर्यात वर्धक योजनाबद्ध रणनीती मुळे उत्पादन धनाधान्यांपासून निर्यात बाजारांतील रकमी (रोखीतील) पिकांपर्यंत गेले.त्यांमुळे धनधान्यांच्या किमती खुपच वाढल्या. जागतिकीकरणामुळे वस्तूचा आणि भांडवलाचा प्रवाह विकसित देशांकडून खुपच वाढला होता, त्यामुळे परिणामी स्वदेशी उद्योग आयात मालाकडे प्रवृत्त झाले. स्वस्तातील आयात मालाने स्वदेशी वस्तूंची जागा घेतली, त्यांमुळे स्वदेशी वस्तूंची मागणी कमी झाली आणि स्वदेशी उत्पादक त्रस्त झाले, त्यांना आयती मालाशी स्पर्धा करावी लागायला सुरुवात झाली. त्यांमुळे औद्योगिक क्षेत्राची प्रगती खालावली. याशिवाय पायाभूत सुविधांची कार्यशीलता ज्यामध्ये विद्युत पुरवठा
समाविष्ट होता, तो पुरेशी गुंतवणूक झाली नसल्याने पुरेसा ठरला नाही. कापडांचे आणि वस्त्रांचे निर्यातीवरील सर्व कोटा निर्बंध भारताकडून हटविले गेले. पण काही विकसित देश जसे यु,एस.ए.यांनी त्यांचे भारताकडून होणाऱ्या कापडाच्या आयातीवरील कोटा निर्बंध हटविले नाहीत. भारताची सरकारी निर्गुंतवणूक योजना यशस्वी झाली नाही कारण सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थांच्या मालमत्ता अवमुल्यीत झाल्या आणि स्वस्त दराने खाजगी क्षेत्राला विकल्या गेल्या. बहूतेक वेळी निर्गुंतवणुकीच्या मार्गाने आलेल्या रकमा सरकारी आवकेच्या कमतरतेची भरपाई करण्यासाठी वापरल्या जात असत, ना की त्या सार्वजनिक क्षेत्रांतील संस्थांच्या प्रगतीसाठी आणि देशांतील सामाजिक पायाभूत सुविधांच्या बांधणीसाठी वापररल्या जात असत. आता विदेशी कंपन्यांची भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये वरचढ भूमिका आहे.त्यांनी त्यांची उत्पादिते येथे विकून भारतीय बाजार पेठेला गिळंकृत केले आहे. अशाप्रकारे ते अमर्याद,अफाट फायदे कमवित आहेत. काही वेळा भारतीय उगीचच त्यांचा पैसा बाजारपेठेतील विविध जागतिक ब्रांडस् वर खर्च करीत असतात. नवीन आर्थिक योजनेने ग्राहकशील तेच्या धक्कादायक वळण पद्धतीला उत्तेजन दिले, त्यासाठी त्यांनी भरभराटीच्या आणि उत्कृष्ट क्रयशिलतेच्या उत्पादनांना उत्तेजन दिले. सेवा क्षेत्रामधील काही ठराविक भागांमध्ये वाढ एकाग्रित झाली जसे दूरसंचार,माहिती तंत्रज्ञान, फायनान्स, करमणूक,प्रवास,आदरातिथ्य सेवा, भू संपत्ती व्यापार ना की इतर सक्षम क्षेत्रे जसे शेती आणि उद्योग, जे की देशातील अनेक लोकांना उपजीविकेची संधी पुरवीत असते.

## ५ . सारांश

१९९१ मधील आर्थिक योजनेला कधी कधी एल.पी.जी.या नावाने ओळखले जाते.(उदात्तीकरण,खाजगीकरण आणि जागतिकीकरण) या सर्व योजनांच्या एकत्रिकरणातून भारतीय अर्थव्यवस्थेवर काही सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम निर्माण झाले. हे अधोरेखित केले पाहिजे की सर्व कुलुपे उघडण्यासाठी एकाच मास्टर की असूच शकत नाही. ती काही समस्या सोडविताना यशस्वी ठरली नाही जसे गरीबी, समाजांतील असमान उत्पन्नाचे वाटप, प्रादेशिक असंतुलन आणि बेरोजगारी इ. १९९१ च्या नवीन आर्थिक योजने पासून भारताच्या जागतिक व्यापाराचे वळण (आयात आणि निर्यात) आणि विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक विचारकरण्या जोगा बदल दर्शवितात. भारत आपली स्थिती जागतिक बाजारात सुधारित आहे.
अलीकडच्या भूतकाळात जागतिक बाजार पेठेत प्रवेश केल्यामुळे सेवाशेत्रांमध्ये अधिक तंत्रज्ञान, वाढ आणि प्रगती दिसून येत आहे. भारत हा जागतिक रिंगणातील (बाजार पेठेतील) की खेळाडू (महत्वाचा घटक) बनलेला आहे.